
# संविधान कसे तयार झाले?




भारतीय समाजातील प्रत्येक प्रांत, धर्म, वर्ग, भाषा आणि संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारे **299 सदस्य** संविधान सभेत होते. या सभेने 9 डिसेंबर 1946 ते 26 नोव्हेंबर 1949 या कालावधीत संविधान तयार केले.

**अध्यक्ष:** डॉ. राजेंद्र प्रसाद

**मसुदा समितीचे अध्यक्ष:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर



## प्रजासत्ताक दिन – 26 जानेवारी 1950

आपण संविधान स्वीकारले आणि आपल्या देशाचा भविष्यातील मार्ग निश्चित केला.

## भारतीय संविधान – जनतेच्या सहभागातून

1948 मध्ये संविधानाच्या मसुद्यावर देशभरातून सूचना मागवण्यात आल्या. देशभरातून **7500** हून अधिक सूचना आल्या. लोकांच्या मतांवर महिनोनमहिने चर्चा होऊन **2000** पेक्षा जास्त बदल करण्यात आले.

**संविधान जागर अभियान**

# संविधानातील मूल्ये

## भारत देश असा घडवायचा

### सार्वभौम




**देश कसा चालवायचा आहे हे आपण सर्व मिळून ठरवू**

कोणताही राजा, धर्मग्रंथ किंवा परदेशी शासक नाही.

आपल्या देशातील निर्णय आपणच घेतो. आपणच या देशाचे खरे मालक आहोत.

### समाजवादी



**देशाची जल, जंगल, जमीन यावर प्रत्येक भारतीयाचा समान हक्क आहे**

देशाची संपत्ती मूठभर लोकांच्या हातात केंद्रित होऊ नये.

ती सर्वांच्या कल्याणासाठी वापरली पाहिजे, विशेषतः गरिबांसाठी आणि समाजातील दुर्बल घटकांसाठी.

### धर्मनिरपेक्ष



**व्यक्तीला धर्म असू शकतो, पण देशाला कुठलाही धर्म नाही**

प्रत्येक भारतीयाला आपल्या पसंतीचा धर्म स्वीकारण्याचे किंवा न स्वीकारण्याचे स्वातंत्र्य आहे.

सरकार सर्व धर्मांना समान व न्याय्य वागणूक देईल.

### लोकशाही



**‘एक व्यक्ती – एक मत, एक मत – समान पत’ या तत्वावर सर्व निर्णय घेतले जातात**

लोक आपले प्रतिनिधी निवडतात, जे त्यांच्यावतीने निर्णय घेतात. भारत हा जगातील पहिला देश आहे ज्याने संविधान लागू झाल्याबरोबर महिलांसह सर्व प्रौढ नागरिकांना मतदानाचा हक्क दिला.

संविधान जागर अभियान

# संविधानातील मूल्ये

## स्वातंत्र्य

लोकांना त्यांच्या
इच्छेनुसार जीवन
जगण्याचे स्वातंत्र्य आहे.



## बंधुता



आम्ही एकमेकांची
भावंडांप्रमाणे
काळजी घेऊ.

आम्ही भाषा,
संस्कृती, अन्न,
पेहराव, पूजा विधी
यांमधील विविधतेचा
सन्मान करू.

## आर्थिक न्याय




संपत्तीचे
केंद्रीकरण होऊ नये
याची काळजी घेणे

## दर्जाची व संधींची समानता

लिंग, जात, धर्म, वंश, जन्मस्थान
यांच्या आधारावर कोणताही
भेदभाव केला जाणार नाही



## राजकीय न्याय

'हमारा गाव, हमारा राज'
या तत्वाप्रमाणे
स्थानिक स्वराज्य संस्था
स्थापन केल्या



## सामाजिक न्याय

महिलांनाही पुरुषांप्रमाणे समान व न्याय्य वेतनाचा हक्क आहे

सर्व घटकांना समान
स्तरावर आणण्यासाठी
संविधानाने 'आरक्षणा'ची
तरतूद केली आहे




संविधान जागर अभियान

# संविधानाचे यश

## स्त्री पुरुष समानता

महिलांना छळ आणि भेदभावापासून संरक्षण देण्यासाठी अनेक कायदे.






## दलित, आदिवासी, भटके विमुक्त आणि इतर मागासवर्गीयांचे सशक्तीकरण

शतकानुशतके शोषित आणि उपेक्षित असलेल्या समाजातील लोक संविधानामुळे शिक्षक, डॉक्टर, अभियंते, व्यवस्थापक, सशस्त्र सेना अधिकारी, राजकारणी, अगदी मुख्यमंत्री तसेच भारताचे राष्ट्रपतीही बनू शकले.

## युवक आणि कामगारांसाठी संविधान

रोजगाराची संधी, लघु उद्योगांना प्रोत्साहन, सार्वजनिक क्षेत्राची उभारणी

### कामगारांचे संरक्षण करणारे कायदे

- युनियन बनवण्याचा हक्क
- पेन्शन
- भविष्य निर्वाह निधी
- 8 तास काम



संविधान जागर अभियान

# संविधानाचे यश

## अनेक भारत एक भारत

परंपरा, संस्कृती, भाषा, जात, धार्मिक श्रद्धा, खाद्यपदार्थ इत्यादींमध्ये वेगळेपण असलेल्या **4,000** हून अधिक समुदायांनी भारत देश बनलेला आहे.





## गरिबांसाठी संविधान

प्रत्येक मुलाला मोफत आणि चांगल्या दर्जाचे शिक्षण,
सर्व नागरिकांना परवडणारी आरोग्य सेवा आणि अन्नसुरक्षेची हमी.

### स्वातंत्र्यानंतर सरकारने प्रत्येक गावात

- आरोग्य केंद्रे उघडली
- शाळा उघडल्या
- गरिबांना अन्न पुरवण्यासाठी रेशन व्यवस्था सुरू केली

## शेतकऱ्यांसाठी संविधान

शेतकऱ्यांसाठी कुळ कायदा लागू झाला;
शेतकऱ्यांना बी-बियाणे, कीटकनाशके, सिंचन सुविधा, वीज, खते, स्वस्त दरात बँक कर्ज उपलब्ध करून दिले.

**पिकाला चांगला भाव मिळण्यासाठी, सरकारने शेतकऱ्यांकडून पीक खरेदी करण्याची व्यवस्था सुरू केली.**



**संविधान जागर अभियान**

# भारतीय संविधानाचे शिल्पकार

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर



त्यांच्या आग्रहामुळे संविधानामध्ये
मार्गदर्शक तत्वांचा समावेश:

या देशाचे **सरकार हे धर्मनिरपेक्षच असावे.** सरकार सर्व धर्मांना समान व न्याय्य वागणूक देईल.

**गरीब-श्रीमंतांमधील दरी कमी करणे** सरकारची जबाबदारी आहे.

लोकांना **चांगले शिक्षण, आरोग्य, पोषण, रोजगाराच्या संधी** देण्यासाठी पैसे नाहीत, असे कारण कोणत्याही सरकारने देऊ नये.

## “सामाजिक चेतना हीच आपल्या अधिकारांची एकमेव हमी आहे.”

अशी त्यांची ठाम भूमिका होती, त्यामुळेच त्यांनी ही आवाहन केले:

# शिका, संघटित व्हा, संघर्ष करा!

**संविधान जागर अभियान**